N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - I)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** जळगाव  **P.S.(ठाणे):** एम.आई.डी.सी  **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0674  **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 05/09/2022 19:18 बजे

2. **S.No. (अ.क्र.) Acts (अधिनियम)**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार  **Date From (दिनांक पासून):** 22/08/2022

**Time Period (कालावधी):** पहर 5  **Date To ( दिनांक पर्यंत):** 22/08/2022

**Time From (वेळेपासून):** 12:38 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:18 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 05/09/2022  **Time (वेळ):** 18:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 024  **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/09/2022 18:59 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 1.5 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** MIDC भागात श्री साई सर्व्हीस स, मधील कार्यालयात जळगाव,जळगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** विनोद भरतसिंग शिंदे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1978  (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**  **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | प्लान18/19,फ्लट न 102,लेक विव्ह्यु रेसिडेन्सी,मेहरुण तलावा जवळ, जळगाव,जळगाव,एम.आई.डी.सी,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | प्लान18/19,फ्लट न 102,लेक विव्ह्यु रेसिडेन्सी,मेहरुण तलावा जवळ, जळगाव,जळगाव,एम.आई.डी.सी,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9823074566

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अनिल सुधाकर सासनिक | | | 1. प्लॉन07, श्रध्दा कॉलनी,,महाबळ जळगाव,जळगाव,रामानंद,जळगाव, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

यातील फिर्यादी यांचा MIDCजळगाव येथे कार रिपेअरींगचा व्यवसाय आहे. फिर्यादी यांनी व्यवसाया साठी प्लॉं.न.B1/2 , हा विहीत भाडेकरार करुन कारच्या रिपेअरींग साठी शेड बांधलेले आहे. सदर प्लॉंटचे जुलै 2022 या महिण्याचे वाढीव लाईटबिल आले होते.त्या बाबत फिर्यादी यांनी MSEB कार्यालयात जावुन तेथील उप अभियंता सुरेश पांचगे यांची भेट घेतली तेव्हा उप अभियंता सुरेश पांचगे यांनी फिर्यादी यांना तुमच्या लाईट बीलामध्ये मंजुर कनेक्टेड लोड हा 2KW एवजी 18 KW करुन घ्यावा लागेल त्यासाठी तुम्ही अनिल नावाच्या खाजगी ईसमास भेटुन घ्या तो सर्व प्रोसिजर सांगेल.असे सागुन त्याचा फोन नंबर दिलात्यानंतर दिनांक 19/08/2022 रोजी फिर्यादी यांनी अनिल याची भेट घेवुन उप अभियंता सुरेश पांचगे यांनी तुला भेटावयास सांगीतले आहे. त्यावर अनिल यांने लाईटबिल पाहुन तुमचा कनेक्टेड लोड 2 KW वरुन 18 KW असा ऑनलाईन अर्ज करुन आणुन देण्याचे मोबदल्यात उप अभियंता सुरेश पांचगे यांचे नाव सांगुन 10,000 रुपये मागणी करीत आहे. त्याबाबत फिर्यादी यांनी दिनांक 22/08/2022 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो जळगाव कार्यालयात तक्रार दिली होती.सदर तक्रारीची दिनांक 22/ 08/2022 रोजी ला.प्र.वि.जळगाव पथकाने पंच साक्षीदार समक्ष पडताळणी केली असता यातील आरोपी अनिल सुधाकर सासनिक, खाजगी ईसम याने फिर्यादी यांचे जळगाव MIDC भागात भाडेकरार केलेले प्लॉंट न.B1/2 या प्लॉंटचे वाढीव लाईटबिलाचे कनेक्टेड लोड 2 KW वरुन 18 KW पर्यंतचे काम करुन आणुन देण्यासाठी उप अभियंता सुरेश पांचगे यांचे नाव सांगुन 10,000 रुपयांची लाचेची मागणी केली आहे. व सदर लाच रक्कम मिळवण्याचा पर्यंत केला म्हणुन गुन्हा.सोबत संगणीकृत केलेली फिर्याद जोडलेली आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): pratap dilsing shikae(I (Inspector)) / pobn630008 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची)
**Name** (नाव): pratap dilsing shikae
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): pobn630008

फिर्याद

एमआयडीसी पोलीस स्टेशन जळगांव
दि. ०५.०९.२०२२.

**मी विनोद भरतसिंग शिंदे,वय ४४ वर्ष, व्यवसाय मोटार कार सर्व्हिस सेंटर,रा.प्लॉट नं.१८–१९ फ्लॅट नं. १०२, लेकव्हिव, रेसीडंन्सी मेहरूण तलावाजवळ जळगांव ता.जि.जळगांव**

समक्ष हजर राहुन फिर्याद लिहुन देतो की, मी दि.२२.०८.२०२२ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, कार्यालय जळगांव येथे हजर राहुन पोनि एस.के.बच्छाव यांचेकडेस खाजगी इसम अनिल यांचे विरुध्द लाचेसंबधी तक्रार दिली होती ती खालील प्रमाणे.

मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबीयासह राहावयास असुन माझा MIDC जळगांव येथे प्लॉट नं. अे ४१ येथे श्रीसाई सर्व्हिस या नावाने कार रिपेअरिंगचा व्यवसाय आहे. सदर व्यवसाय मी सुमारे १५ वर्षापासुन करीत आहे. माझ्या व्यवसायाचे स्वरूप व काम वाढल्याने मी MIDC जळगांव मधील छाया इंडस्ट्रीज या नावाचा प्लॉट नं. बी १/२ हा त्यांच्या संयुक्त तीन मालकाच्या नावाने विहीत भाडेकरार करून भाडेतत्वावर मागील दोन वर्षापासुन कार रिपेअरिंगच्या व्यवसायासाठी घेतला आहे. व तेथे देखिल मी माझ्या कार रिपेअरिंगचा व्यवसाय करतो.सदर प्लॉटचा वापर मी माझ्या व्यवसायासाठी करीत आहे.

सदर प्लॉट मी व्यावसाईक कामासाठी वापरत असल्याने सदर प्लॉटवर कारच्या रिपेअरिंगसाठी शेड बांधलेले आहे.मला दरमहिण्याला सदर प्लॉटचे येणारे लाईट बिल मी नियमीतपणे भरीत असतो.परंतु जुन २०२२ या महिण्यामध्ये मला प्लॉट नं. बी १/२ याचे वाढीव लाईट बिल आल्याने त्याबाबत मी खात्री करण्यासाठी जुलै महिण्यात MIDC जळगांव विभागातील MSEB कार्यालयात जावुन तेथिल उप अभियंता सुरेश पाचंगे यांना भेटलो. त्यानंतर मी माझे वाढीव आलेले लाईट बिल त्यांना दाखवुन त्याबाबत विचारणा केली असता, उप अभियांता सुरेश पाचंगे यांनी माझे वाढीव आलेले लाईट बिल पाहुन मला सांगितले की, तुमच्या लाईट बिलामध्ये मंजुर कनेक्टेड लोड हा २KW असुन सॅक्शंन लोड **२६.११** आहे. त्यामुळे तुमच्या लाईट बिलामध्ये वाढीव बिल आकारण्यात आले आहे. तुम्हाला तुमचा कनेक्टेड लोड हा १८KW पर्यंत करून घ्यावा लागेल. त्यानंतर तुमचे लाईट बिल नियमीत येईल असे सांगितले. त्यावर मी त्यांना १८KW कनेक्टेड लोड करण्यासाठी काय प्रोसिजर आहे असे विचारले असता उप अभियंता सुरेश पाचंगे यांनी मला सागितले की, माझा अनिल या नावाचा खाजगी इसम आहे. त्याला तुम्ही जावुन भेटा, तो तुम्हाला सर्व प्रोसिजर सांगेल असे सांगुन त्यांनी मला त्याचा मोबाईल नंबर ८८०५५४०८०० असा दिला. त्यानंतर मी तेथुन निघुन आलो.

त्यानंतर मी अनिल यास फोन करून सदर कामाबद्दल विचारले असता त्याने सांगितले की, मी तुमच्याकडुन तुमच्या प्लॉटचे लाईट बिल घेवुन जाईल. त्यानंतर दि. २५.०७.२०२२ रोजी अनिल हा माझे आफिसमध्ये आला व माझे प्लॉट नं. बी १/२ याचे वाढीव लाईट बीलाची ऑनलाईन प्रक्रीया करण्यासाठी सदर प्लॉटच्या लाईट बिलाची झेरॉक्स घेवुन गेला. त्यानंतर थोडया वेळात येवुन त्याने मला सांगितले की तुमचे ऑनलाईन काम केले आहे मी तुम्हाला नंतर येवुन भेटतो असे सांगुन तो निघुन गेला.

दि.१९.०८.२०२२ रोजी मी अनिल यास फोन करून माझ्या MIDC जळगांव येथिल साई सर्व्हिस सेंटरच्या ऑफिसमध्ये बोलावुन घेतले व त्यास माझा MIDC जळगांव येथिल प्लॉट नं.बी १/२ च्या आलेल्या वाढीव लाईट बिलाच्या कामाविषयी बोलुन, मला उप अभियंता सुरेश पाचंगे यांनी तुला भेटावयास सागितले आहे.त्यावर अनिल याने मला सागितले की, तुमच्या लाईट बिलामध्ये कनेक्टेड लोड २ KW वरून १८KW पर्यंत करण्यासाठी तुम्हाला ऑन लाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया करावी लागेल, ती मी केली आहे. त्याबाबत उप अभियंता सुरेश पाचंगे यांनी मला तुमच्याकडुन १०,०००/– रूपये घेण्यास सांगितले आहे. सदर रक्कम मी उप अभियंता सुरेश पाचंगे यांना देवुन तुमचे काम लागलीच करून आणतो असे सांगितले होते. मी एक व्यवसाईक असल्याने अशा प्रकारे लाईट बिलाच्या कामासाठी १०,०००/–रूपये लागत नाही याची मला माहिती आहे. यावरून माझी खात्री झाली की, अनिल हा खाजगी इसम उप अभियंता सुरेश पाचंगे याचे नाव सांगुन त्यांचे कडुन माझे लाईट बिलाचे काम करून आणुन देण्यासाठी १०,०००/– रूपयाची मागणी करीत आहे. त्यामुळे मी अनिल यास आता माझे कडे पैसे नाहीत मी तुला नंतर बोलावतो असे सांगुन त्यास जाण्यास सांगितले.

अनिल या खाजगी इसमाने माझ्याकडे उप अभियंता सरेश पाचंगे यांचे नाव सांगुन माझा MIDC जळगांव येथिल प्लॉट नं. बी १/२ च्या लाईट बिलाचे दुरूस्तीचे काम करून आणुन देण्याच्या मोबदल्यात १०,०००/– रूपयाची मागणी करीत आहे. त्यासंदर्भात मी दि.२२.०८.२०२२ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव समक्ष हजर राहुन तक्रार दिली होती.

त्यानंतर बच्छाव साहेब यांनी पुढील लाचेसंबंधी तक्रारीची पडताळणी कार्यवाही माझे MIDC जळगांव येथे प्लॉट नं.बी १/२ या ठिकाणी करण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे मी,दोन्ही पंच, बच्छाव साहेब व सापळा पथक असे जळगांव शहरातील MIDC भागातील प्लॉट नं. बी १/२ या ठिकाणी गेलो. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरी मधील मेमरीकार्ड मध्ये माझे व दोन्ही पंचाचे पडताळणी कारवाई पुर्व वक्तव्य घेतले.त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला व पंच क्र.०१ यांना पडताळणी दरम्याण बोलण्या विषयीच्या थोडक्यात सुचना दिल्या.

त्यानंतर बच्छाव साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन दिले. त्यानंतर मला पंच क्रं. १यांचेसह खाजगी इसम अनिल यांच्याशी लाचेची बोलणी करण्यासाठी MIDC भागातील श्रीसाई सर्व्हिस सेंटर येथे दि.२२.०८.२०२२ रोजी १२.३८ वाजता रवाना केले. त्यावेळी सापळा पथक व पंच क्र.०२ असे जळगांव शहरातील MIDC येथिल प्लॉट नं. बी १/२ या ठिकाणी थांबुन होते.

त्यानंतर १३.१८वाजता मी व पंच क्रं. १ असे कारने जळगांव शहरातील MIDC येथिल माझे प्लॉट नं. बी १/२ येथे परत गेलो. तेव्हा बच्छाव साहेब यांनी माझे कडील डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन ते बंद केले. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी पंच क्रं.१ यांना सापळा पथकापासुन रवाना केल्यानंतरची घडलेली हकीगत विचारली असता पंचांनी "मी व तक्रारदार असे श्रीसाई सर्व्हिस सेटंर येथे गेलो. तेथिल ऑफिसमध्ये एक इसम बसलेला होता. तक्रारदार हे त्यांच्या खुर्चीवर जावुन बसले. तक्रारदार यांनी सदर

इसमास अनिल भाऊ नमस्कार, एक महिना झाला माझ्या कामाचं, पाचंगे साहेबांनी असे सांगितले त्यावेळी खाजगी इसम अनिल याने साहेबांनी प्रोसेस करून आणा, आणि ऑफिसला समींट करा, मी ते काम ऑनलाईन केलेले आहे. त्याचा तुम्हाला मॅसेज आलेला असेल. त्यावर तक्रारदार यांनी तो नंबर जागेच्या मालकांचा असु शकतो असे सांगुन काय बोलले पाचंगे साहेब असे अनिल यास विचारले असता, अनिल यांनी ते डाक्युमेन्ट घेवुन आणि समींट करून देतो. त्यांच्यानंतर पेमेंन्टचे,साहेब म्हणे बघुन घे **"दहा हजारपर्यंत"** कर असे सागितले. त्यावर तक्रारदार यांनी दहा हजार रूपये असे विचारले असता खाजगी इसम अनिल यांनी **हं..** म्हणुन दुजोरा दिला. त्यानंतर तक्रारदार यांनी पाचंगे साहेबांबद्दल विचारले असता खाजगी इसम अनिल याने पाचंगे साहेब स्पष्ट बोलले नाही, काय होईल ते करून घे असे सागितले. त्यांच्याच हातात काम आहे तेच अॅप्रुवल देतील. त्यानंतर तक्रारदार यांनी खाजगी इसम अनिल यास आपण पांचगे साहेबांना भेटुन घेतले असता ते माझे परिचयाचे आहेत असे बोलले, त्यावेळी खाजगी इसम अनिल यांनी साहेबांशी भेट होवुन जाईल, तेव्हा तक्रारदार यांनी एवढे १०,०००/—रूपये जास्त होतात ना? असे सांगितले. त्यावर खाजगी इसम अनिल यांनी त्यामध्ये डिवाय एक्झीकेटीव्ह, बारापत्रे साहेब, आफीस क्युसी भुषण तेलंग साहेब असे नावे सांगितले. त्यानंतर तक्रारदार पैसे केव्हा द्यायचे असे विचारले असता खाजगी इसम अनिल यांनी **"आज दिले आज द्या, उद्या द्यायचे,"** असे उत्तर दिले. त्यावेळी तक्रारदार यांनी एक दिड घंटयानी देतो असे सागितले. त्यानंतर मी व तक्रारदार असे उप अभियंता सुरेश पाचंगे यांना भेटण्यासाठी व ते देखिल पैसे मागतात काय? यासाठी त्यांच्या एमएसईबी कार्यालयाजवळ गेलो. तेथे तक्रारदार यांना उप अभियंता सुरेश पाचंगे हे दिसुन आले नाही म्हणुन त्यांनी मोबाईल फोन लावला व स्पिकर चालु केला. त्यावेळी तक्रारदार यांनी उप अभियंता पाचंगे यांना तुम्ही सांगितल्याप्रमाणे अनिल यास भेटलो, तेंव्हा उप अभियंता पाचंगे यांनी सदर प्रकरणाशी अनिल याचा काय संबंध आहे, मी तुम्हाला त्याला भेटा असे बोललो नाही. बाबत हकीगत कथन केली. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला घडलेली हकिगत विचारली असता मी देखील पंच क्र.१ यांच्या सांगण्याप्रमाणे मिळती जुळती हकिगत सांगितली.

त्यानंतर बच्छाव साहेब व दोन्ही पंचानी व्हॉईस रेकॉर्डर मधील माझे, खाजगी इसम अनिल व पाचंगे साहेब यांचेत झालेले संभाषण ऐकले. तेव्हा खाजगी इसम अनिल यांनी माझे कडेस १०,०००/—रु.लाचेची मागणी केली असल्याची खात्री झाली. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी पुढील सापळा कार्यवाही सलगपणे एकत्रितरित्या करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर बच्छाव साहेब यांनी सापळापुर्व कामी अॅथ्रासिन पावडर नोटांना लावण्याचे प्रात्यक्षिक करण्याचे ठरविले.त्यानंतर मी माझे घर खर्चातुन हजर केलेली लाचेची रक्कम १०,०००/—रु.त्यात ५००/—रु.दराच्या २० चलनी नोटांना अॅथ्रासिन पावडर लावुन सदर लाचेची रक्कम माझे शर्टच्या खिश्यात ठेवुन दिली होती.

तेव्हा बच्छाव यांनी मला फोन लावुन खाजगी इसम अनिल कुठे भेटतील याबाबत विचारण्यास सांगितल्याने मी फोन लावुन स्पिकर चालु केला व अनिल भाऊ कुठय हे,येता मं, मला गावाला जायचं होत.तेव्हा त्यांनी अर्ध्या एक घंटयात इकडचं काम आवरल की फोन करतो त्यानंतर बच्छाव साहेबांनी मार्गप्रतीक्षा करण्याचा निर्णय घेतला.

मार्गप्रतिक्षा करुन बराच वेळ झाल्याने खाजगी इसम अनिल याचा फोन न आल्याने बच्छाव साहेबांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून देवुन मला व पंच क्र.१ यांचेसह खाजगी इसम अनिल यांना १०,०००/— रूपये लाच रक्कम देण्यासाठी श्रीसाई सर्व्हिस सेंटर, जळगांव येथे १४.५१ वाजता रवाना केले. त्यावेळी सदर ठिकाणी बच्छाव साहेब सापळा पथक थांबुन होते.

त्यानंतर १७.३८ वा. मी सापळा पथकास कोणत्याही प्रकारचा इशारा न करता पंच क्रं. १ यांचेसह सदर ठिकाणाहुन निघुन प्लॉट नं. बी १/२ येथे गेलो. आमचे मागोमाग सापळा पथक देखील आले. तेव्हा बच्छाव साहेब यांनी माझे कडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन ते बंद केले व पंच क्र.१ यांना हकीकत विचारली असता पंचानी मी व तक्रारदार असे श्रीसाई सर्व्हिस सेंटर जळगांव येथे गेलो. तेथे तक्रारदार यांनी खाजगी इसम अनिल यांची वाट पाहीली. बराच वेळ वाट पाहुन ही खाजगी इसम अनिल हे न आल्याने तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल फोनवर खाजगी इसम अनिल यास फोन लावला व स्पिकर चालु केला. त्यावेळी खाजगी इसम अनिल याने माझे शिरसोली येथे काम चालु आहे,मी अर्धा एक तासाने येतो असे सांगितले. खाजगी इसम अनिल हा अर्धा एक तासाने येणार असल्याने मी व तक्रारदार असे वाट पाहत थांबलो, परंतु एक तास होवुन देखिल खाजगी इसम हा न आल्याने तक्रारदार यांनी परत खाजगी इसम अनिल यास फोन लावुन स्पिकर चालु करून कधी येणार आहे, किती वेळ लागेल असे विचारले असता त्याने मी अजुन शिरसोलीलाच आहे, मला अजुन एखादा तास लागेल, तेव्हा तक्रारदार यांनी त्यास मला पाचोरा येथे गावाला जावयाचे आहे, मी तुला शिरसोली येथे भेटु का? त्यावेळी अनिल याने मी शिरसोलीच्या आत मध्ये गावात आहे, तुम्ही जावुन या नंतर भेटु अशी हकीगत कथन केली.

सदर कार्यवाहीअंती माझी व खाजगी इसम अनिल यांची भेट न झाल्याने तसेच डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकुन खाजगी इसम अनिल याने मला गावाला जावुन या नंतर भेटु असे सांगितल्याची बच्छाव साहेबांची खात्री झाल्याने सदर सापळा कारवाई स्थगित केली. त्यानंतर बच्छाव साहेबांनी माझे कडील १०,०००/—रु.लाचेची रक्कम पुढील कारवाईसाठी ताब्यात घेवुन सापळा कारवाई पुर्ण केली. त्यानंतर बच्छाव साहेबांनी पुढील सापळा कार्यवाही खाजगी इसम अनिल यांचा मला ज्या दिवशी फोन येईल त्या दिवशी करण्याचा निर्णय घेवुन मला व दोन्ही पंचाना गोपनियता राखण्याच्या सुचना दिल्या होत्या. तसा पंचनामा केला आहे.

त्यानंतर मी दि.२५.०८.२०२२ रोजी लाप्रवि कार्यालयात जावुन बच्छाव साहेबांची भेट घेवुन दि.२६.०८.२०२२ रोजी खाजगी इसम अनिल हा मला भेटु शकतो असे सांगितले होते. त्याप्रमाणे बच्छाव साहेब, दोन पंच व सापळा पथक असे दि.२६.०८.२०२२ रोजी सापळा कारवाई साठी साहीत्यासह माझे प्लॉट नं.बी १/२येथे हजर होते.तेव्हा बच्छाव साहेबांनी पुढील सापळा कारवाई सुरु करून मला व पंच क्रं. १ यांना सुचक सुचना दिल्या. त्यावेळी बच्छाव साहेबांनी मला खाजगी इसम अनिल हा कुठे भेटेल असे विचारण्यास सांगितले.तेव्हा मी माझे मोबाईल फोनवर खाजगी इसम अनिल यास फोन लावुन स्पिकर चालु केला त्यावेळी खाजगी इसम अनिल याने मी सध्या घरी आहे, आणि आता मी साहेबांच्या कामानिमित्ताने जळगांव शहरातील कोंबडी बाजारातील MSEB चे

डिव्हीजन ऑफिसला जात आहे,तेथे मला एक ते दिड तासाचे काम आहे.माझे काम आटोपल्यावर मी बारा वाजेपर्यंत आपल्या ऑफिसला येतो असे सांगितले.त्यानंतर बच्छाव साहेबांनी सदर ठिकाणी थांबुन वाट पाहीली. बराच वेळ झाल्याने खाजगी इसम अनिल याचा मला फोन न आल्याने बच्छाव साहेबांनी मला व पंच क्रं.१यांना खाजगी इसम अनिल याची भेट घेण्यास पाठविण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर बच्छाव साहेबांनी दि.२२.०८.२०२२ रोजी सापळा स्थगिती पंचनाम्या दरम्यान ताब्यात घेतलेले १०,०००/—रुपये माझ्या शर्टच्या खिश्यात ठेवनु दिली.त्यानंतर बच्छाव साहेब यांनी माझे कडे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर देवुन मला पंच क्रं.१ याना लाचेची रक्कम देण्यासाठी जळगांव शहरातील कोंबडी बाजारातील MSEB चे डिव्हीजन ऑफिसला पाठविले होते. त्यानंतर बच्छाव साहेबांनी सदर ठिकाणी सापळा पथक नेमले.

त्यानंतर मी सापळा पथकास लाच स्विकारल्या बाबतचा कोणताही इशारा न करता मी व पंच क्र.०१ असे सदर ठिकाणाहुन निघुन माझे प्लॉट नं.बी १/२ येथे गेलो. सदर ठिकाणी बच्छाव साहेब, पंच क्रं.२ व सापळा पथक आले. त्यानंतर बच्छाव साहेबांनी माझे कडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन पचं क्रं.१ यानां सापळा पथकापासुन रवाना केल्या नंतरची घडलेली हकीगत विचारली असता पंचाना मी व तक्रारदार असे सापळा पथकापासुन निघुन जळगावं शहरातील कोंबडी बाजारातील MSEB चे डिव्हीजन कार्यालयात खाजगी इसम अनिल उभा असलेल्या ठिकाणी गेलो. तेव्हा तक्रारदार यांनी त्यास इलेक्ट्रीक बिलाचे दुरुस्तीचे ऑनलाईन कामाबाबत विचारणा केली, तेव्हा त्यानें तुमचे इलेक्ट्रीक बिलाचे दुरुस्तीचे ऑनलाईन काम येत्या हप्त्यात होऊन जाईल, तुम्ही चिंता करु नका, साहेबांना आपल्यावर मुळीच विश्वास नाही, साहेब बाहेरगावी गेलेले आहे. तेव्हा तक्रारदार यांनी १०,०००/— रुपये लाचेची रक्कम शर्टच्या खिश्यातुन काढुन खाजगी इसम अनिल यास देवु केली असता खाजगी त्याने १०,००० /— रुपये लाच रक्कम घेण्यास नकार दिला व तमुच्याकडून कुठ जातील पैसे नंतर काम झाल्यावर बघू, तुमचे काम होऊन जाईल तुम्ही टेंन्शन घेवू नका बाबत हकीगत कथन केली.

त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला घडलेली हकीगत विचारली असता मी पंच क्र.०१ यांनी कथन केल्याप्रमाणे हकीगत सांगितली.तसेच त्यांनी माझेकडुन लाचेची रक्कम स्विकारली नाही. त्यांच्या देहबोली वरून त्यांना माझे विषयी संशय आलेला असावा तसेच तमुच्याकडून कुठ जातील पैसे नंतर काम झाल्यावर बघू, तुमचे काम होऊन जाईल तुम्ही टेंन्शन घेवू नका असे सांगितले. त्यामुळे खाजगी इसम अनिल हा माझेकडून आता लाचेची रक्कम स्विकारेल असे वाटत नाही बाबत सांगितले. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी माझे १०,०००/—रु. नोटा बदलवुन मला परत दिले. तसा पंचनामा केला आहे.

त्यानंतर मी दि.२६.०८.२०२२ रोजी खाजगी इसम अनिल याने माझे जवळुन लाचेची रक्कम स्विकारली नाही. तसेच ते आता यापुढे माझेकडुन लाचेची रक्कम स्किारतील असे मला वाटत नाही. त्यांचे देहबोली वरुन त्यास माझे विषय संशय आला असावा म्हणुन त्यांनी लाच रक्कम घेतली नाही. तरी त्यांचेवर पुढील योग्य ती कार्यवाही व्हावी बाबत जबाब दिला आहे.

त्या अनुषंगाने आज दि.०५.०९.२०२२ रोजी मला अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयात बोलाविण्यात आले. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी तुम्ही दिलेल्या तक्रारी वरुन पुढील कार्यवाही करावयाची आहे. बाबत सांगितले, त्यानंतर बच्छाव साहेब यांना खाजगी इसम अनिल याच्या मिळालेल्या पत्त्यावर मी तसेच बच्छाव साहेब, दोन शासकीय पंच व सापळा पथक असे आम्ही महाबळ, जळगांव भागात खाजगी इसम अनिल याचे घरी गेलो. तेव्हा खाजगी इसम अनिल हा त्याचे राहते घरी मिळून आल्याने बच्छाव साहेब यांनी अनिल यास त्यांची व सापळा पथकाची ओळख सांगितली, त्यावेळी खाजगी इसम अनिल याने सांगितले की, माझे मोटर सायकलचा अपघात झाला असुन सदर अपघातात माझे उजव्या पायास फॅक्चर असल्याने माझे पायास प्लास्टर केले असल्याचे सांगितले. त्यावेळी बच्छाव साहेब यांनी खाजगी इसम अनिल यास त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव अनिल सुधाकर सासनिक, व्यवसाय खाजगी नोकरी इलेक्ट्रीक प्लॉट नं.७, श्रध्दा कॉलनी, महाबळ, जळगांव मुळ रा. तहसिल ऑफिसच्या मागे, आनंद नगर, जितुंर ता. जितुंर जि. परभणी असे सांगितले. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी अनिल सुधाकर सासनिक यास पुढील कारवाई कामी अॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव कार्यालयात घेवुन आले आहे.

तरी खाजगी इसम अनिल सुधाकर सासनिक, व्यवसाय खाजगी नोकरी इलेक्ट्रीक प्लॉट नं.७, श्रध्दा कॉलनी, महाबळ, जळगांव याने दि. २२.०८.२०२२ रोजी १२.३८ ते १३.१८ वा.चे दरम्यान जळगांव शहरातील श्रीसाई सर्व्हिस सेंटर येथे पंच क्र.०१ यांचे समक्ष माझे जळगांव एमआयडीसी भागात भाडेकरार केलेले प्लॉट नं.बी १/२ या प्लॉटचे वाढील लाईट बिलाचे कनेक्टेड लोड **२ KW** वरून **१८KW** पर्यंत चे काम करून आणुन देण्यासाठी उप अभियंता सुरेश पाचंगे यांचे नाव सांगुन १०,०००/—रुपयांची लाचेची मागणी करून सदर लाच रक्कम मिळविण्याचा प्रयत्न केला.

अशा प्रकारे खाजगी इसम अनिल सुधाकर सासनिक, व्यवसाय खाजगी नोकरी इलेक्ट्रीक प्लॉट नं.७, श्रध्दा कॉलनी, महाबळ, जळगांव यांनी आपल्या वैयक्तीक प्रभावाचा वापर करुन व उप अभियंता सुरेश पाचंगे यांचेशी माझी वैयक्तीक ओळख आहे असे सांगुन माझे जळगांव शहरातील एमआयडीसी भागात भाडेकरार केलेले प्लॉट नं.बी १/२ या प्लॉटचे वाढील लाईट बिलाचे कनेक्टेड लोड **२KW** वरून **१८KW** पर्यंत चे काम उप अभियंता सुरेश पाचंगे यांचे कडुन करुन आणुन देण्याचे सांगुन माझेकडे १०,०००/— रुपयांची लाचेची मागणी केली व सदर लाच रक्कम मिळविण्याचा प्रयत्न केला. म्हणुन माझी त्यांचे विरुध्द फिर्याद आहे.

माझी वरील नमुद फिर्याद मी स्वत: वाचुन पाहीली सदरची फिर्याद मी सांगितल्याप्रमाणे संगणकावर टंकलीखीत केली असुन ती बरोबर व खरी आहे.

**समक्ष**

एस.के.बच्छाव
पोलीस निरिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

**फिर्यादी सही**
दि.०५.०९.२०२२